| MHPA160000462022 | दाखल दिनांक | – | ०५.०१.२०२२ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | – | ०५.०१.२०२२ |
| | निकाल दिनांक | – | ०५.०६.२०२६ |
| | कालावधी – ०४ व. ०५ म. ०० दि. | | |

| | | |
|---|---|---|
| | **<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी यांचे न्यायालयात</u>**<br><br>**(पिठासीन अधिकारी : एम. एस. काझी)**<br>**(न्यायनिर्णय दिनांक ०५.०६.२०२६ रोजीचा)**<br>**नियमीत फौजदारी खटला क्र. ०९/२०२२**<br>**नि.क्र.५२/ब** | |
| | पाथरी पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. ४७/२०२१ भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३,५०४,५०६ सहकलम ३४ अन्वये | |
| सरकार पक्ष / फिर्यादी | | महाराष्ट्र शासन<br>पाथरी पोलीस ठाणे तर्फे<br>सौ. सुरय्या परविन भ्र. मोहम्मद फहीम कूरेशी, |
| विधिज्ञ | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्रीमती आर.एस.सुतार, |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | | ०१. हसनोद्दीन यासीन कुरेशी,<br>वय ६० वर्ष धंदा मजूरी,<br>०२. मदिनाबी हसनोद्दीन कुरेशी,<br>वय ५५ वर्ष धंदा घरकाम,<br>०३. फय्यूम हसनोद्दीन कूरेशी,<br>वय २६ वर्ष मजूरी,<br>०४. शेख रहिम हसनोद्दीन कुरेशी,<br>वय ३२ वर्ष धंदा मजूरी,<br>सर्व रा. मिस्कीन प्लॉट, आठवडी बाजार, जिंतूर, ता. जिंतूर, जि. परभणी. |
| आरोपींचे विधिज्ञ | | श्री. ए.एस.पौळ, |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८.०५.२०१८ ते २०.१२.२०२० |
| फिर्याद दाखल तारीख | ३०.०१.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०५.०१.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०९.११.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २९.०४.२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०५.०६.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | -- |

| आरोपी चा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | हसनोद्दीन यासीन कुरेशी, | -- | २०.१२.२०२२ | भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३,५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २ | मदिनाबी हसनोद्दीन कुरेशी, | -- | २०.१२.२०२२ | भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३,५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३ | फय्यूम हसनोद्दीन कूरेशी, | -- | ०९.११.२०२३ | भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३,५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ४ | शेख रहिम हसनोद्दीन कुरेशी, | -- | २०.१२.२०२२ | भा.दं.वि. कलम ४९८ (अ), ३२३,५०४, | निर्दोष मुक्त | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०६ सहकलम ३४ अन्वये | | | |

## साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | सुरय्या परवीन भ्र. मो. फहिम कुरेशी | फिर्यादी | ४३ |

**ब. आरोपी साक्षीदार, जर असेल तर –**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयाचा साक्षीदार, जर असेल तर –**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

## निशाण्यांची यादी

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ४४ | फिर्याद वरील सही |
| २ | ४५ | प्रथम खबर अहवाला वरील सही |

## ब. आरोपीपक्ष –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## क. न्यायालयाची निशाणी –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २४ | दोषारोप |

## ड. महत्वाच्या बाबी –

| अनु.क्र. | महत्वाच्या बाबी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्यायनिर्णय

## (जाहीर दिनांक ०५.०६.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये आरोप निश्चित करुन खटला चालविणेत आला.

अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,

२. फिर्यादी हिचा विवाह आरोपी क्र.३ याच्या सोबत दिनांक ०८.०५.२०१७ रोजी मूस्लीम धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे मानवत येथे झाला.

त्यानंतर फिर्यादी व आरोपी क्र.०३ यांना त्यांच्या विवाहसंबंधातून दोन मूली झाल्या. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस तूला मूलीच होतात व त्यांच्या बाळांतपणाचा खर्च होतो म्हणून त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर सर्व आरोपींनी फिर्यादीस प्लॉट घेण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपए आण म्हणून शारिरीक व मानसीक त्रास देण्यास सुरुवात केली व सदर मागणीपोटी फिर्यादीस उपाशी पोटी ठेवून तिचा मानसिक व शारिरीक छळ केला. तसेच फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी ही दुस–यांदा गरोदर असतांना आरोपींनी तिला शिवीगाळ करुन व हूडंयाची मागणी करुन तिच्या मूलीसहीत तिला घरातून हाकलून दिले. त्यानंतर फिर्यादी ही तिच्या बहिणीकडे राहण्यास आली. दिनांक २०.१२.२०२० रोजी सर्व आरोपी हे आले व त्यांनी फिर्यादीस प्लॉट घेण्याकरिता पाच लाख रुपए दिले तरच तूला नांदविणार नाहीतर तलाक देऊन दूसरे लग्न करणार असे म्हणून फिर्यादीस शिवीगाळ करुन थापड–बुक्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तेंव्हापासून फिर्यादी ही तिच्या बहिणीकडे पाथरी येथे राहते. त्यानंतर फिर्यादीने पाथरी पोलीस ठाणे येथे प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पाथरी पोलीस ठाणे मध्ये आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी गुन्हा रजि.नं.४७/२०२१ अन्वये गुन्हा नोंद

करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस नाईक ५१५ एम.आर.गजभार यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी महत्वाची कागदपत्रे हस्तगत केली, साक्षीदारांची टिपणे नोंदवली. तपासाअंती त्यांनी प्रस्तुतच्या आरोपींविरुध्द सबळ गुन्हादर्शक पुरावा आढळून आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधासाठी नि.क्र.२४ कडे आरोप निश्चित केले. ते आरोपींना वाचून दाखविले व मराठीत समजावून सांगितले असता, आरोपींनी त्यांचे वरील आरोप अमान्य केले व अभियोगाची संपरिक्षा करण्याची विनंती केल्याने त्यांच्याविरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपींचे विरुध्द कोणताही गुन्हादर्शक तथ्य मिळुन आला नसल्याने आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. वरील सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी माझे पुढे उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | दिनांक ०८.०५.२०१८ ते २०.१२.२०२० पर्यंत मिस्कीन प्लॉट, जिंतूर ता. जिंतूर, जि. परभणी येथे, आरोपी क्र.३ फिर्यादीचा पती या नात्याने व ईतर आरोपी हे आरोपी क्र.१ | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | चे नातेवाईक या नात्याने, त्यांच्या सामूहिक उद्देशाच्या पुरःसरणार्थ, फिर्यादी नामे सुरय्या परविन भ्र. मोहम्मद फहिम कुरेशी हिला तिच्या माहेरहून प्लॉट घेण्यासाठी रु. ५,००,०००/– रुपयाची मागणी करुन, सदर मागणीच्या पुर्ततेसाठी तिला, शिवीगाळ, मारहाण करुन उपाशी पोटी ठेवले व त्यायोगे तिचा शारीरीक, मानसिक छळ केला आणि त्या परिणामी आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४९८(अ) सहवाचनिय कलम ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | – | नाही |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस थापड–बुक्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत करून त्याव्दारे भारतीय दंड विधान कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | – | नाही |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, सर्व आरोपींनी सामाईक उद्दीष्टापोटी फिर्यादी हिचा आपखुशीने अपमान करुन त्यायोगे तिला प्रक्षोभीत केले आणि अशा प्रक्षोभनामुळे तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा, किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा | – | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| | त्यामागे उद्देश होता किंवा असे होण्याचा संभव असल्याची आरोपींना जाणीव होती आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे काय ? | | |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली व त्यामुळे फिर्यादी भयभित झाली आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | – | नाही |
| ५. | अंतिम आदेश काय ? | – | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीता</u>** –

६. आरोपींवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरता अभियोग पक्षाने फिर्यादी सुरय्या परविन भ्र. मोहम्मद फहिम कुरेशी (निशाणी क्र.४३) हिस साक्षीदार क्र.१ म्हणून तपासले.

७. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ हिने तिच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले की, आरोपी क्र.०१ हा तिचा पती आहे. लग्नानंतर ती आरोपी सोबत जिंतूर येथे नांदावयास गेली. त्यानंतर आरोपीत व तिच्यात क्षूल्लक कारणावरुन वादावादी होत होती. या व्यतिरिक्त काहीही झालेले नाही. त्यानंतर फिर्यादीने आरोंपी विरुध्द फिर्याद दिली. पुराव्यात तिने दिलेली फिर्याद तिला दाखवण्यात आली असता तिने फिर्याद नि.क्र.४४ वरील सही तिची असल्याचे परंतू त्यातील मजकूर तिला माहित नसल्याचे तिने कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने सरकारी वकीलांनी तिला सूचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास उपयुक्त असा कोणताही पुरावा पटलावर आला नाही.

८. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने तिची व आरोपींची न्यायालयाबाहेर राजीखुशीने तडजोड झाली असल्याचे व आणखी साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले आहे.

९. आरोपींविरुध्द सदर प्रमाणे गुन्हा सिध्द करण्याकरीता आरोपींनी फिर्यादीस उपाशी पोटी ठेवून, थापड–बुक्यांनी मारहाण करुन, जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे तिचा शारिरीक व मानसीक छळ केल्याचे सिद्ध करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने स्पष्टपणे तिच्यामध्ये आणि आरोपींमध्ये तडजोड

झाल्याचे मान्य केले आहे आणि तिला आरोपीकडुन कोणताही शिवीगाळ, मारहाण तसेच शारिरीक व मानसीक त्रास झाल्याचे नाकारले आहे. मुळतः फिर्यादी हिच्या पुराव्यात आरोपींविरुध्द त्यांना दोषी ठरविण्याइतपत स्पष्ट पुरावा आला नाही. तसेच, अभियोगपक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा तपासी अधिकारी यांना तपासण्यात आलेले नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे इतर कोणतेही साक्षीदार तपासण्यात आलेले नाही. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेली फिर्यादी हिने अभियोगपक्षास पुराव्यात पुरक अशी मदत केलेली नाही. त्यामुळे फिर्याद ही सिध्द झालेली नाही व सदर साक्षीदारा व्यतिरीक्त अभियोग पक्षास मदत करणारे इतर कोणतेही साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. या परिस्थीतीचा विचार करता, आरोपीं विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषसिध्दीसाठी सक्षम असा पुरावा आलेला नाही. आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ, मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली व शारिरीक व मानसीक त्रास दिल्याचा कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोष सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे प्रस्तुतच्या खटल्यामध्ये अभियोगपक्षाने सादर केलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता प्रस्तुत आरोपींवर ठेवण्यात आलेले भारतीय दंड विधान

कलम ४९८ (अ),३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वयेचे दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्यामध्ये अभियोगपक्षाला अपयश आले आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.५ बाबत** –

११. मी यापुर्वीच मुद्दा क्र.१ ते ४ यांना नकारार्थी उत्तर दिले असल्याने, आरोपींची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.०१. हसनोद्दीन यासीन कुरेशी, ०२. मदिनाबी हसनोद्दीन कुरेशी, ०३. फय्यूम हसनोद्दीन कूरेशी, ०४. शेख रहिम हसनोद्दीन कुरेशी, यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६ सहकलम ३४ नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. त्यांना सोडून देण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/– चा जामीन द्यावा. तो जामीन सहा महिन्यांकरीता असेल.

४. आरोपींना खुले करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

स्वाक्षरित/–

पाथरी, (एम. एस. काझी)

दिनांक – ०५.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पाथरी.